UGC Care Listed Journal, ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

Rani Laxmibai Mahavidyalaya IQAC PAROLA Dist.Jalgaon

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

## कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक

[भाग-१]

• संपादक •

डॉ. शिवाजी हुसे

• अतिथी संपादक •

डॉ. सर्जेराव जिगे    डॉ. यशवंत सोनुने

• संपादक मंडळ •

डॉ. सुभाष बागल
डॉ. सुभाष शेकडे
डॉ. एकनाथ शिंदे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. दत्तात्रय डुंबरे
डॉ. राज मुसणे
डॉ. दिलीप बिरुटे
डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. रंजना कदम
डॉ. सुखदेव इघारे

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| १६. | लोकशाही मूल्यांचे उपासक - छत्रपती शिवाजी महाराज<br>- डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे | ५९ - ६३ |
| १७. | छत्रपती शिवाजी महाराज यांचे 'आरमार' विषयक धोरण – आज्ञापत्रकृत<br>- प्रा. राधाकिसन पांडुरंग मुठे | ६४ - ६६ |
| १८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा मानवतावादी दृष्टिकोन<br>- अजित जयराम जाधव | ६७ - ६८ |
| १९. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वराज्यविषयक दृष्टिकोन<br>- प्रा. जगदीश रामभाऊजी वाटमोडे | ६९ - ७२ |
| २०. | छत्रपती शिवाजी महाराजांचे राजकीय कर्तृत्व,<br>- डॉ. सीता ल. केंद्रे | ७३ - ७५ |
| २१. | छत्रपती शिवाजी महाराजांचे आरमार<br>- प्रा. महेश शिवाजीराव जाधव | ७६ - ७८ |
| २२. | शिवरायांचे कृषी धोरण आणि महसूल व्यवस्था - एक अभ्यास<br>- डॉ. रावसाहेब भीमराव नेरकर | ७९ - ८० |
| २३. | छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती<br>- प्रा. धर्मदास वी. घोडेस्वार | ८१ - ८४ |
| २४. | छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासनविषयक भूमिका<br>- प्रा. विजय शांमराव कांडलकर | ८५ - ८८ |
| २५. | छत्रपती शिवाज़ी महाराज : साहित्यातील प्रतिमा आणि इतिहास<br>- प्रशांतकुमार प्रल्हाद डोंगरदिवे | ८९ - ९१ |
| २६. | शिवाजी महाराजांच्या आरमार उभारणीत बसरूरच्या स्वारीचे महत्त्व<br>- प्रा. डॉ. भानुसे कारभारी लक्ष्मण | ९२ - ९५ |
| २७. | शिवपूर्वकालीन व शिवकालीन ग्रामीण जीवन '<br>- प्रा. देवीदास भटू भामरे | ९६ - ९९ |
| २८. | छत्रपती शिवाजी महाराज : कर्तृत्व<br>- प्रा. डॉ. संजय राजधर महाले | १०० - १०४ |
| २९. | शिवशाहीवरील वसंत कानेटकरांचे ऐतिहासिक नाट्यपंचक<br>- प्रा. डॉ. प्रफुल्ल टी. बन्सोड | १०५ - ११० |
| ३०. | शिवकालीन निवडक बखरी<br>- डॉ. रमेश बलभीम जाधवर | १११ - ११३ |
| ३१. | सभासद बखरीमधील अफजलखान वध<br>- प्रा. डॉ. आशा सोपान गिरी | ११४ - ११६ |


Rani Laxmibai Mahavidyalaya IQAC PAROLA Dist. Jalgaon



Scanned with OKEN Scanner



Rani Laxmibai Mahavidyalaya
IQAC
PAROLA
Dist. Jalgaon

# शिवरायांचे कृषी धोरण आणि महसूल व्यवस्था - एक अभ्यास

- डॉ. रावसाहेब भीमराव नेरकर
इतिहास विभाग,
राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा

आपल्या राष्ट्राला कृषिप्रधान राष्ट्र म्हणून संबोधले जाते. आपल्या राष्ट्रात आणि राज्यातही शेती हा प्रमुख व्यवसाय गणला जातो. उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी असे सूत्र इसवी सनाच्या विसाव्या शतकापर्यंत प्रचलित होते; परंतु एकविसाव्या शतकात हे चित्र पार बदलले. उत्कृष्ट नोकरी, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती अशी स्थिती निर्माण झाली. या स्थितीला समाज का येऊन पोहोचला याची अनेकविध कारणे आहेत; परंतु कोणत्याही काळाच्या समाजाच्या स्थितीला त्या ठिकाणची प्रशासनव्यवस्था आणि धोरणाची अंमलबजावणी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडीत असते. या बाबीची पूर्वमीमांसा करताना शिवशाहीच्या काळाकडे आपल्याला दृष्टिक्षेप टाकावा लागतो. कोणत्याही काळातील प्रशासन चालविणाऱ्यांना मार्गदर्शक ठरेल अशी उत्कृष्ट महसूल व्यवस्थेची निर्मिती आणि अंमलबजावणी छत्रपती शिवरायांनी केली. सदासर्वकाळ मार्गदर्शक ठरेल अशी दीपस्तंभाची भूमिका पार पाडणारी महसूल व्यवस्था, एक आदर्शतम व्यवस्था म्हणून गणली जाते. सतराव्या शतकात आपल्या देशात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा लवलेशही नसताना शिवरायांनी अनुसरलेले सारेच धोरण आश्चर्यकारक होते. धर्माधिष्ठित राजपदाला साजेसे गुण राजांच्या व्यक्तिमत्त्वात सामावलेले होते. त्याचाच परिपाक त्यांच्या प्रशासकीय धोरणात ठिकठिकाणी जाणवतो. आपल्या तेजस्वी बुद्धिमत्तेने आणि उत्कृष्ट प्रशासक या नात्याने त्यांनी राबवलेली प्रशासनव्यवस्था साऱ्या जगाला मार्गदर्शक ठरेल अशीच होती. छत्रपती शिवरायांनी प्रशासनात कोणत्याही योजना, धोरण आखताना रयतेला केंद्रस्थानी ठेवले. रयत ही बहुतांशी शेती व्यवसाय करणारी असल्याने शेतकऱ्यांशी निगडित जमीन महसुलाचे धोरण राबवीत असताना शेतकरीहित कधीच नजरेआड होऊ दिले नाही.

**शिवरायांची शेतीव्यवस्था-**

छत्रपती शिवरायांनी आपले जमीन महसुलाचे धोरण राबवीत असताना सर्वप्रथम राज्यातील जनतेला प्रोत्साहन देत शेती व्यवसायाकडे प्रवृत्त केले. राज्यातील शेती ही लागवडीयोग्य व्हावी यासाठी कसोशीने प्रयत्न केले. संपूर्ण राज्यातील जमिनीची प्रथम मोजणी केली. शिवरायांनी जमीन मोजणीसाठी काठी हे परिमाण निश्चित केले होते. ही काठी पाच हात पाच मुठी लांब असायची. या काठीस शिवशाही काठी असे म्हटले जाते. २० चौरस काठ्यांचा एक पांड, वीस पांडांचा एक बिघा हे जमीन मोजण्याचे परिमाण ठरलेले होते. त्यानंतर जमिनीची प्रतवारीनुसार विभागणी केली. आदर्श राजपदाला शोभेल असे धोरण शेतीव्यवस्थेबाबत राजांनी अवलंबले. परंपरागत अन्याय आणि अत्याचार करणारी जमीनदारी आणि जहागिरी पद्धत प्रथम बंद केली. त्याऐवजी रयतवारी पद्धती सुरू केली. शिवरायांनी शेतीव्यवस्थेबाबत वस्तुनिष्ठतेच्या दृष्टिकोनातून सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच त्यांचे महसूल प्रशासन लोकप्रिय ठरले. शेती व्यवसायाला उत्तेजन देण्यासाठी त्यांनी तगाईची पद्धती सुरू केली. शेतीचो अवजारे बी-बियाणे, पाळीव प्राणी घेण्यासाठी रोख रक्कम सरकारकडून देण्याची व्यवस्था केली. तसेच पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी सरकारी खजिन्यातून रक्कम दिली. शेतकरीवर्गाला हा पैसा बिनरव्याजाने आणि शेतीचे उत्पादन आल्यावर टप्प्याटप्प्याने भरण्याची मुभा दिली होती. नापीक जमीन लागवडीखाली आल्यानंतर काही वर्षे ती शेती कसणाऱ्या शेतकऱ्याकडून सारा वसूल केला जात नसे. जेणेकरून शेतकरीवर्गाला शेती व्यवसाय करण्यास उत्तेजन मिळावे, हा राजांचा हेतू होता. मुसलमानी सत्तेत दलालांमार्फत



Scanned with OKEN Scanner